महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

---

Email ID: itcell-rdd@mah.gov.in दूरध्वनी क्र.-०२२-२२०१६७३७.

Comp. No.: १४०९६५०

File No.: ZPFMS-६३२५/प्र.क्र.१८८/मातंक दिनांक : १८/११/२०२५.

---

प्रति,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

विषय :- जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टीम, (ZPFMS) या प्रणालीसाठी वित्तिय वर्ष २०२४-२५ अखेर करावयाच्या कामकाजाबाबत.

संदर्भ:-

१. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.आयटी-२०१६/प्र.क्र.५९/मातंक, दि. १४ ऑक्टोबर, २०२०.
२. ग्रामविकास विभागाचे पत्र क्र. झेडपीए-२०२५/प्र.क्र.४१ / मातंक दिनांक १० मार्च २०२५
३. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.आयटी-२०१६/प्र.क्र.५९ (भाग-२) / मातंक दिनांक २५ मार्च २०२५
४. ग्रामविकास विभाग, पत्र क्रमांक आयटी-२०१६/प्र.क्र.५९/ मातंक दिनांक ०४ एप्रिल, २०२५
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर याचे दि. १६.०७.२०२५ रोजीचे पत्र.
६. ग्रामविकास विभाग, पत्र क्रमांक आयटी-२०१६/प्र.क्र.५९/ मातंक दिनांक २२ मे, २०२५
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,बुलढाणा यांचे दि.२३.०९.२०२५, रोजीचे पत्र.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना, यांचे दि.०२.०७.२०२५, रोजीचे पत्र.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,सोलापुर, यांचे दि.१६.०७.२०२५, रोजीचे पत्र.
१०.सरपंच,ग्रामपंचायत कार्यालय फोंडशिरस,सोलापुर यांचे दि.२७.०९.२०२५. रोजीचे पत्र.

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.४ येथील शासन पत्र समक्रमांक दि.०४ एप्रिल, २०२५ अन्वये, जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टीम (ZPFMS) या प्रणालीसाठी वार्षिक लेखा सन २०२४-२५ चे

लेखांकन पुर्ण करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार सन २०२४-२५ चे लेखांकन दि. ३० एप्रिल, २०२५ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक होते. तथापि, लेखांकन विहित वेळेत पूर्ण न झाल्याने संदर्भ क्र. ६ येथील शासन पत्र समक्रमांक दि. २२ मे, २०२५ अन्वये सर्व जिल्हा परिषदांना लेखांकन पुर्ण करण्यासाठी दि. २७ मे, २०२५ ते २८ मे, २०२५ रोजीची मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार सदर कालावधीमध्ये सर्व जिल्हा परिषदांनी लेखांकन पुर्ण करणे आवश्यक होते. तथापि संदर्भ क्र. ५, ७, ८, ९, १० येथील विविध जिल्हा परिषदांनी पाठविलेल्या पत्रानुसार त्यांना आलेल्या तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित देयकांचे लेखांकन राहिल्याचे कळविले आहे.

सदर लेखाकंन पूर्ण करण्यासाठी वाढीव कालावधी देण्याबाबत जिल्हा परिषद सोलापूर, जालना, बुलढाणा यांच्याव्दारे शासनास विनंती करण्यात आली आहे. सदर तांत्रिक अडचणींची अपवादात्मक बाब विचारात घेऊन आता सर्व जिल्हा परिषदांकरीता लेखांकन पूर्ण करण्यासाठी दि. २०.११.२०२५ ते दि. २१.११.२०२५ रोजीचा कालावधी देण्यात येत आहे. या कालावधी नंतर कोणत्याही कारणास्तव लेखांकनासाठी वाढीव कालावधी शासनाकडून देण्यात येणार नाही.

उपरोक्त कालावधीमध्ये जिल्हा परिषद अंतर्गत मंजूर होऊन पुर्ण झालेल्या कामांच्या देयकाचे लेखांकनाचे काम पूर्ण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

(प्रशांत पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर.

१. प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचे स्वीय सहाय्यक, ग्रामविकास विभाग,
२. विभागीय आयुक्त, (सर्व)
३. उपसचिव (वित्त) बांधकाम भवन, ग्रामविकास विभाग, फोर्ट, मुंबई.
४. अवर सचिव (वित्त-६), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
६. राज्य समन्वयक तथा सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.
७. महा प्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, लोकमंगल, १५०१ शिवाजीनगर, पुणे-४११००५.
८. निवड नस्ती (कार्यासन-मातंक), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई. १/३१११४८/२०२५.